# ७ गोमंतक स्वातंत्र्याचा इतिहास - पोवाडा

२०)

चौक १

वंदितो प्रथम गजानना | विनंती रावळा | ध्यावा हे ध्याना |
गोमंतक स्वातंत्र्याचा इतिहास || हंसत ज्यांनी केलं अर्पण प्राणांस |
मुजरा त्या संमध्या शूरवीरांस ||

१४९८ साल | आपल्या देशाला | अपशकुन झाला | काय दैवानं
दावा साधला || फिरंग्यानं पोंदरा पाय लावला | तेव्हांपासून जुलूम सुरू
झाला ||

वास्को डी गामा दर्यावर्दी | व्यापारांत दर्दी | दिली त्यानं वर्दी |
जहाजं नांगरली कालिकोतला || आला झामोरीनच्या दरबारला | अदबी
नं झुकुन मुजरा केला ||

राजाला नजराणा दिला | तराजू पुढं केला | वचन बोलला | अनुज्ञा
द्यावी व्यापार करण्यास || झामोरीन भुलला गोड बोलांस | मिरची मसाल्यांचा
व्यापार करण्यास | मंजुरी दिली त्यानं गामास ||

आवळा देऊन काढला कोहळा | कपटी फार झाला | राव भारी त्याच
उंट जणू अरब दरबाराला || दया दावुन तंबूमध्ये घोतला | लागला मालक
हाकालायला ||

(चाल) मसाल्याची लागली गोडी | गामानं लावली तागडी ||
जाईना जिभेची खोडी | करू लागे लांडीलबाडी ||
कालिकोतच्या व्यापारावरती | लागला करू कुरघोडी ||
दुसऱ्याला घर बुडवून | म्हणे भरू आपली तुंबडी ||
संतापला राजा झामोरीन | फिरंग्याची पाहून करकडी ||
ओळखुनी कावा गामाचा | हाकलिला करून तो तडी ||

(चाल) अशा परी कालिकोतला | डाव हुकला | अपेशी हरला | हात हलवीत परत चालला
आश्रय त्याने मिळे कानानूरला | व्यापाराची सनद मिळे त्याला ||

पृथ्वीराजासंगें भांडून। गाऊबंदकीनं। जयचंद भूपानं। घोर घोरीसं घरांत घेतला॥ किमारी सर्पा वाणी फिरला। त्यानं दोघांसनी डंख केला॥ २

(चाल) कांनानूरच्या नृपानं त्या वेळा। इतिहास डोळ्यांआड केला।
कुबुद्धि आपली विकली ढाणकाला।
झामोरीनचा शत्रु तो मित्र आपुला केला॥
व्यापाराची सनद दिली त्याला। गळ्यामध्यें घातला गळा।
फिरंग्यानं परी केसानं कापला गळा॥
टाकूवर मिरीं वाटून गामा परतला॥
मागुती थेडके काब्राल येऊन कोचीनाला॥
आमिष दिलं कोचीन राजाला। कालिकातचं तक देऊं तुला।
करूं ठार तुझ्या शत्रूला। परी एक विनंती तुला।
व्यापाराची वखार घालण्याला। परवाना द्यावा आम्हाला।
ऐकून लाघवी बोलाला। कोचीन राजा हुरळून गेला।
मागचा पुढचा विचार नाहीं केला।
उडी घातली; फिरंग्याच्या मासा फांसा गळा॥
स्थापिल्या वखारी फिरंग्यांनी कोचीन कानानूराला॥
फिरंग्याच्या जहाजांनीं अंमल स्थापित केला॥
व्यापार मिरची मसाल्याचा त्यांचा वाढला॥

(चाल) हळूहळू आला कटाक्ष। व्यापार नकोसा झाला॥
राज्याचा ध्यास घेतला। लागला पाय पसरायला॥
ओसरी दिली पाहुण्याला। भोसकावं त्यानं मालकाला॥
फिरंग्यानं प्रकार असा केला। नाहीं सीमा त्यांच्या कपटाला॥

(चाल) तरमुची दांडी काढून केली तलवार॥
दोन पारड्यांचं झालेत स्वरूपांतर॥

व्यापाराची वखार जाहली दारूचं कोठार ॥
केलं सज्ज हळू हळू फिरंग्यानं आरमारी
धिंगाणा घालूं लागले सागरावर ॥
तव्हां राज्य करी गोव्यांत विजापूरकर ॥

(चाल) १५१० सालांत । हिन्दुस्थानांत । आल्बुकर्क आला । यानं पोर्तुगीज मध्यें नंबर पहिला ॥ गोव्याचा कबजा त्यानं घेतला । राज्य करण्याचा बेत केला ॥

फिरंग्यानं धुमाकूळ केला । सासष्टी बारदेश महालांत । सत्तरी तिसवाडी भातग्रामास । भक्कम रोविले पाय पेडण्यास । झेंडा उभारला कोंकण प्रांतास ॥

पहिल्यानंच विचार नाहीं केला । आसरा दिला । नकळत या निरव्या गनीम आम्ही स्वतां घरांत घेतला ॥ दूध पाजलें भुजंगाला । म्हणुन काय सोडील स्वभावाला ॥

(अपूर्ण)

---

मुंबई
रचना सन १९५५